# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
# ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३
# कार्यपत्रिका क्र. ८
# सभावृत्तांत

दिनांक :- १९/१०/२०१६ वेळ :- दु. १२.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक १९/१०/२०१६ रोजी दु. १२.३० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.आशाताई ज्ञानेश्वर सुर्यवंशी | अध्यक्षा |
| २. | मा. शमीम पठाण | |
| ३. | मा..को-हाळे अनंत सुभाष | |
| ४. | मा.साबळे छाया जगन्नाथ | |
| ५. | मा.जगताप विमलताई सुरेश | |
| ६. | मा.बारणे निलेश हिरामण | |
| ७. | मा.बारणे झामाबाई बाळासाहेब | |
| ८. | मा.पवार यमुनाताई रमणनाना | |
| ९. | मा.गायकवाड विनय उर्फ विनायक रमेश | |
| १०. | मा.कलाटे स्वाती मयुर | |
| ११. | मा.शरद माणिकचंद लुणावत | स्विकृत सदस्य |
| १२. | मा.गिरीष ज्ञानेश्वर शेडगे | स्विकृत सदस्य |
| १३. | मा.गोरक्ष दशरथ पाषाणकर | स्विकृत सदस्य |

याशिवाय खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.सुभाष माछरे – क्षेत्रिय अधिकारी ब क्षेत्रीय कार्यालय, मा.रविंद्र जाधव प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, मा.देवण्णा गटटुवार, - कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, मा.एम.एस.मोरे – कार्यकारी अभियंता, विदयुत विभाग, मा.डॉ.जॉन सुनिल, एस.एम.ओ, तालेरा रुग्णालय मा.एम.एम.इनामदार, लेखाधिकारी , ब क्षेत्रीय कार्यालय , मा.सी.बी.कोंडे – उपअभियंता, स्थापत्य , मा..सी.एन.धानोरकर – उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.एस.एन.वाघ – उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.एकनाथ पाटील – उपअभियंता विदयुत विभाग, मा.राजेंद्र डुंबरे – उपअभियंता, जलनिसारण विभाग, मा.पारोल के.बी. मुख्य आरोग्य निरिक्षक , आरोग्य विभाग ब क्षेत्रीय कार्यालय मा.आर.पी.कोतवाल - क्रिडा पर्यवेक्षक, क्रिडा विभाग ब क्षेत्रीय कार्यालय इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष सौ.आशाताई सुर्यवंशी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

अ) तदनंतर मागील कार्यपत्रिका क्र. ७, दि. २१/०९/२०१६ रोजी झानेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.अध्यक्ष यांनी प्रकट केले.

ठराव क्र. ५१ विषय क्र. १
दि. १९/१०/२०१६ विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.निलेश बारणे अनुमोदक: मा.विमलताई सुरेश जगताप

संदर्भ :- मा.निलेश बारणे यांचा दिनांक १०/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ४९ स.नं.९ मधील बापूजीबुवानगर थेरगांव येथे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सुरु करण्यात येणा-या रुग्णालयाचे भुमिपूजन नुकतेच करण्यात आले या रुग्णालयाचा फायदा येथील स्थानिक गरजू रुग्णांना होणार आहे. तरी सदर रुग्णालयास हिंदूहदय सम्राट मा.बाळासाहेब ठाकरे स्मृति रुग्णालय असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबतच्या प्रस्तावाचा विचार करणे

( विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा) .

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ५२ विषय क्र. २
दि. १९/१०/२०१६ विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा. अनंत को-हाळे अनुमोदक: मा निलेश बारणे

संदर्भ :- मा. अनंत को-हाळे यांचा दिनांक २१/९/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

मोरया गोसावी क्रिडांगणामध्ये परिसरातील नागरीकांसाठी वाचनालय मनपातर्फे चालु करण्यात आले असून, त्या वाचनालयास प्रबोधनकार ठाकरे असे नांव देणेकामीच्या प्रस्तावाचा विचार करणे

( विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा) .

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ५३ विषय क्र. ३
दि. १९/१०/२०१६ विभाग – ब क्षेत्रीय कार्यालय प्रशासन विभाग
सुचक : मा.शमीम पठाण अनुमोदक: मा.यमुनाताई पवार

संदर्भ :- क्र.बक्षे/प्रशा/१/कावि/७७६/२०१६, दिनांक १४/१०/२०१६ रोजी मा.क्षेत्रिय अधिकारी यांचा प्रस्ताव . .

मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्रमांक स्वमअक/२/कावि/०९/२०१६, दिनांक २८/९/२०१६ अन्वये मा.क्षेत्रिय अधिकारी ब क्षेत्रीय कार्यालय यांची दिनांक ३ ऑक्टोंबर २०१६ ते दिनांक ६ ऑक्टोंबर २०१६ या दरम्यान स्वच्छ भारत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने United Service Institution Of India Rao Tula Marg ,New Delhi येथे प्रशिक्षणास नामनिर्देशित करण्यात आले होते. त्यानुसार ते सदर प्रशिक्षणास उपस्थित झाले असून त्यांना तेथे उपस्थित रहाणेकामी येणा-या खर्चाची बिले संबंधीत अधिका-यांनी आपले सध्याच्या विभागात उपलब्ध असलेल्या “प्रवास भत्ता” या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावी असे आदेश आहेत. त्यानुसार त्यांनी सदर दिल्ली येथील प्रशिक्षणासाठी उपस्थित रहाणेकामी येणा-या खर्चाची बिले सादर केल्यास ब क्षेत्रीय कार्यालय प्रशासन विभागाकडील प्रवासभत्ता या लेखाशिर्षावर सन २०१६-२०१७ करीता र.रु.१५,०००/- इतकी तरतुद करण्यात आली असून, आज अखेर र.रु.१४,८९५/- इतका खर्च झाला असून, र.रु.१०५/- इतकी रक्कम शिल्लक आहे. प्रशासन विभागाकडील प्रवास भत्ता या लेखाशिर्षावर तरतुद कमी पडत असल्याने सदर लेखाशिर्षावर आणखी र.रु.५०,०००/- तरतुद वर्ग करणे आवश्यक आहे. ब क्षेत्रीय कार्यालय प्रशासन विभागाकडील वाहन

इंधन (अधिकारी) या लेखाशिर्षावर सन २०१६-२०१७ करीता र.रु.५,००,०००/- इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. माहे सप्टेंबर २०१६ अखेर र.रु.५८,०००/- इतका खर्च झालेला असून, र.रु.४,४२,०००/- इतकी रक्कम शिल्लक आहे. सदर लेखाशिर्षावरुन प्रवास भत्ता या लेखाशिर्षावर र.रु.५०,०००/- इतकी तरतुद वर्ग करणे गरजेचे आहे.

ब क्षेत्रीय कार्यालय प्रशासन विभागाकडील प्रवास भत्ता या लेखाशिर्षावर तरतुद कमी पडत असल्याने सदर लेखाशिर्षावर आणखी र.रु.५०,०००/- इतकी तरतुद प्रशासन विभागाकडील (अधिकारी) या लेखाशिर्षावरील शिल्लक असलेल्या तरतुद र.रु.४,४२,०००/- मधून र.रु.५०,०००/- प्रवास भत्ता या लेखाशिर्षावर तरतुद वर्ग करता येईल.

वरिल तरतुद वर्ग करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १०३ ब अनुसुची प्रकरण ७ (२) व मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ६२८४, दिनांक १६/९/२००८ तसेच मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ५०७, दिनांक २०/१०/२००८ नुसार यथाप्रस्तावित र.रु.५०,०००/- इतकी प्रवास भत्ता लेखाशिर्षकावर तरतुद वर्ग करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
[आशाताई ज्ञानेश्वर सुर्यवंशी ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/ ५४९ /२०१६.
दिनांक : ०५ / ११ /२०१६

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना